म. ग्रं. सं

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचें नांव

७८

धार्मे

ग्रं. सं. ठाणें

श्री

हें पुस्तक

# रामेश्वरकर जातीच्या संशय निवृत्त्यर्थ धर्मरक्षण व्हावें ह्मणून

श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्यांचे शिष्यत्वास अनुसरून
रामचंद्र गोविंद शास्त्री बाम—अलीबाग
स. स. छा. चे उत्पादक.

यांनीं

## समस्त ब्रह्मवृंदापुढें

विचार घेण्याकरितां ठेविलें असे.

मिती श्रावण वद्य १ शाके १८१७

---

अलीबाग–सत्यसदन प्रेस.

नि॰ २००

# विज्ञापना.

कोकणस्थ, देशस्थ, कऱ्हाडे प्रभृति एकत्र पंक्तिव्यवहार असणाऱ्या समस्त ब्रह्मवृंदांस धर्मरक्षणार्थ प्रार्थना करितों कीं, महाराज? आपल्या ब्राह्मण्यावर ज्या अनेक लोकांच्या धाडी पडत आहेत त्यापैकींच सांप्रत कांहीं रामेश्वरकर लोकांची धाड पडली आहे कीं काय? हा मोठा संशय उत्पन्न झाल्यामुळें हा सर्व प्रांत खळबळून गेला आहे. खऱ्या धर्मशीलानें त्या लोकांशीं कसें वागावें या विषयीं मनाचा कोणताच निर्बंध होत नाहीं. ह्मणून त्या लोकांच्या जातिविषयींची जी माहिती जगापुढें आली आहे ती पैकीं ज्या गोष्टी न्याय करण्याच्या कामीं उपयुक्त आहेत त्यांसह या लोकांचा झालेला वृत्तांत आपणापुढें ठेवीत आहें. तर तो अवलोकनांत आणून यज्ञोपवीताचा मान राखण्याकरितां आपण या लोकांच्या जातिनिर्णयाच्या कामीं आपले अभिप्राय कळविण्याची सत्वर कृपा करतील.

त्याच प्रकारें जे संस्थानिक, श्रीमंत, विद्वान, सभ्य लोक श्रीसेतुबंधरामेश्वरीं यात्रेकरितां गेले असतील त्यांनीं या लोकांशीं व्यवहार कसा ठेविला होता? व तो समजून किंवा

यांची माहिती नसल्यामुळें. त्याचप्रमाणें या लोकांचे आहार विहार वगैरेची कांहीं व्यवस्था दिसली असल्यास ती कशी होती? या गोष्टी कळविण्याची तेही मेहेरबानी करतील.

धर्मसंबंधी खरें बोलण्यास कोणाचीही भिती नाहीं हा न्याय सर्वांस माहित आहेच. त्यांतून या लोकांच्या जातिनिर्णयाच्या कामीं कित्येकांनीं हे पंचद्रविड नव्हेत, यांनां वेद शिकण्याचाही अधिकार नाहीं, अशाही भर कोर्टांत जबान्या दिल्या आहेत व त्यांजबराबर अन्नव्यवहार केल्या बद्दल शंकराचार्यांनीं प्रायश्चित्तेंही दिलीं आहेत. तेव्हां कोणास कांहीं शंका असल्यास त्यांनीं आपला धर्म राखण्याच्या हेतूनें पाहिजे ती गोष्ट स्पष्ट बोलण्यास कोणाचीही भीति वाळगूं नये. हें मी सुचवून ठेवितों.

स्थळास्थळाहून उत्तरें मात्र सत्वर येतील अशी काळजी वाळगावी. कारण सुरळीत नसलें तर जातिसंकर होण्याचा वेळ जवळ येऊन पोंचला आहे. असें समजलें पाहिजे. कळावें हे विज्ञापना.

कित्येक धर्माभिमानी मंडळीच्या सूचनेवरून—
सेवा करणार.
रामचंद्र गोविंद शास्त्री नाम प्रसिद्ध इंदूरकर
राहणार नागांव.

# या प्रकरणाचा साद्यंत सारांश.

सेतुबंधरामेश्वर येथील पंचधान्याच्या कोडबोळ्या प्रमाणें देशस्थ, कोकणस्थ वगैरे ब्राह्मणाच्या उपनांवाच्या कांहीं लोकांची सुमारें चार वर्षांपासून आमच्या प्रांतावर स्वारी होऊन ब्राह्मणांच्या लग्नांच्या मुलींवर त्यांच्या उड्या पडूं लागल्या आहेत. कोणी एकादी बाई अथवा बावा दारिद्रानें मरणोन्मुख झालेला पाहिला कीं शुद्ध कावळ्यासारखी नजर. एखादा लालची दलाल बगलेंत घ्यावा आणि तेथें जावें. मग दीड हजार रुपये पडतना? व मुलगी कशीही असेना? तिला स्त्रीचे अवयव असले पुरे. रुपयांची रास पाडून लागलेंच सावधान. एकदा " नातिचरामि " ह्मणजे तीनवार टिराटिम् झालें कीं चालली मुलगी दक्षिण दिशेला. कदाचित् जर यमाजीपंताची कृपा झाली तरच हीं झाडें पुन्हा तिच्या दर्शीस पडायचीं. अशा या चार वर्षांत आमच्या प्रांताच्या वसई, नाटसूर, आक्षी, नागांव, किहिम, श्रीवर्धन वगैरे ठिकाणच्या सुमारें आठ दहा मुली खपल्या.

याही उठाठेवीची कोणास गरज नव्हती. कारण "कर्त्तौ कर्ताच लिप्यते" या न्यायानें जो करील तो भरील हा न्याय मनांत आणून मंडळी उगाच बसली होती. पण त्यांत दुसरेंच

एक उपस्थित झालें कीं, हे रामेश्वरकर ब्राह्मणच नव्हत. कोणी ह्मणतो यांचे गोत्रसंबंध तपासा. कोणी ह्मणतो यांचे आहार विहार हे पहा. खरें या बडबडीत कांहीं अर्थ नाहीं असें ह्मणून डेक्कें मिटणी करावी तर ज्या ठिकाणीं हे दोनशें वर्षें राहतात त्या ठिकाणीं या रामेश्वरकरांशीं कोणीच ब्राह्मण अन्नव्यवहार करीत नाहींत. इतकेंच नव्हे तर हे रामेश्वरकर ब्राह्मण नव्हत असेंही उघड बोलतात. ह्मणून वरसई अशी येथील ग्रामस्थांनीं आपल्या ग्रामांतील दिलेल्या मुलींची पृथक् योग्य व्यवस्था ठेऊन व त्यांच्या मातापितरांसही समजूत देऊन ते उभय ग्रामस्थ अलिप्त राहिले. पण आमच्या गांवांत जरी ही गोष्ट कळली होती तरी येथें विद्वत्समुदाय मोठा असल्यामुळें कोणताही निर्बंध झाला नाहीं. इतकेंच नव्हे तर कित्येक लोक रामेश्वरकरांच्या आग्रहास पडून त्यांजकडून समाराधना करवून त्यांच्या पंक्तीस पोटभर जेवले. व आमच्या गांवांतील सभ्य लोकांच्या कळकळयाच्या मुख्या रामेश्वरकरांच्या जाबड्यांत सांपडल्या असल्या कारणानें ते दिवस जरी दुष्काळाचे नव्हते तरी तो भोजनसमारंभ बराच रगडला गेला. तथापि सर्वत्र अग्नि धुमसतच होता ह्मणून मु० वरसई येथून त्यांच्या उद्योगावरून श्रीजगद्गुरु मठ शृंगेरी यांचें

आलेलें आज्ञापत्र नांगावास येऊन धडकलें, तें पत्र येणें प्रमाणें.

नंबर २७४ श्री

## शिक्का कानडी भाषा

## श्री जगद्गुरु शंकराचार्य स्वामीचा.

### श्री जगद्गुरु श्रृंगेरी मठ संस्थाना कडून.

वरसई तालुके पेण जिल्हा कुलाबा येथें दिनकर कृष्ण छत्रे यांस. तुमचीं पत्रें सर्वही येऊन पोंचलीं. रामेश्वर येथें राहणार आर्य ब्राह्मण यांच्या वहिवाटी कळण्याकरितां रामेश्वर येथें उत्तर पाठविलें होतें. त्याचें उत्तर येण्याचें अवश्य आहल्यावरून तुह्मास प्रत्युत्तर देण्यास अवकाश जहाला नाहीं. आर्य ब्राह्मण ह्मणणार ब्राह्मणां पैकीं एक तऱ्हेचें ब्राह्मण आहेत. परंतु त्यांच्या घरीं पंचद्रविडा पैकीं ब्राह्मण लोक अन्नव्यवहार करण्याची व कन्या संबंध करण्याची सुद्धां पूर्वीपासून वहिवाट नाहीं.

कन्या देणें घेण्याची वहिवाट आपापल्या लोकांमध्यें करून घेत होते. परंतु पंचद्रविडापैकीं देत नव्हते. हल्लीं तेथील कोकणस्थ वगैरे लोकांनीं त्यांस कन्या दिल्याचें कळून येतें, हें बहुत अनाचर दिसतें. परंतु अज्ञानवशांत हें कार्य संभव जाहलें. हल्लीं याजबद्दल कार्य संपून गेल्या कारणानें

आतां कांहीं करण्यास अवकाश नाहीं. ज्या गृहस्थांनीं कन्या दिल्या आहेत त्यांनीं त्या कन्याकडून व कन्या करून घेतले लोकांकडून अन्नव्यवहार सोडून द्यावे. सदरील गृहस्थ व कोणकोणास अन्नव्यवहार संबंध झाले आहेत त्या सर्वत्रांस ब्राह्मण सभ्यांनीं पंचगव्यपूर्वक यथोक्त प्रायश्चित्त व्यवहारांत घ्यावें.

जमखिंडीकर जनार्दन बापट यांस उत्तर दिलें आहे त्याची नक्कल कानडींत आहे, कारणांनीं तुह्मास पाठविली असतां उपयोग नाहीं. तारीख २० माहे नवंबर सन १८९३

मुक्काम मदरी ता० पळणी — सही कानडी

जिल्हा मजकूर — कारभारी शिक्याची

नक्कल करणार दिनकरराव छत्रे — कारभारी.

हें आज्ञापत्र सभेंत गेल्या बराबर ज्या ज्या लोकांनीं ती मेजवानी घेतली होती त्यांनीं पंचगव्याचें रेचक घेऊन व रामेश्वरकरांकडे दिलेल्या मुलींस पृथक् ठेऊन ते दोषमुक्त झाले. परंतु त्या आज्ञापत्रांत लिहिल्या प्रमाणें स्वामी महाराजां कडून विशेष चौकशीचें आज्ञापत्र कधीं येतें इकडे सर्वांचे डोळे लागले होते. व दरम्यान् त्यांजकडे ग्रामस्थांचा अर्ज ही गेला असल्यामुळें जगद्गुरूचें उत्तर ही

रामेश्वराहून आज्ञापत्र येईल असें आलें होतें. पुढें जगद्गुरूंची स्वारी रामेश्वरीं जाऊन तेथें चौकशी चालली. त्यावेळीं या रामेश्वरकर मंडळींनीं आपण ब्राह्मण ठरावें ह्मणून शरीरद्वारा व द्रव्यद्वारा ज्या लटपटी चालविल्या त्याचा नमुना समजण्या करितां एक मासला लिहितों. ह्मणजे हे ब्राह्मण आहेत कीं नाहीं ह्मणून जे नागांवचे लोक ओरडतात, त्याच नागांवांत जी कांहीं मंडळीच्या साह्यानें एक सभा भरून समाराधना झाली तो पुरावा त्यांनीं स्वामी पुढें दिला कीं नागावांत आह्मी त्यांच्या जातीचे महाराष्ट्र ब्राह्मण ठरलों. ही गोष्ट येथें फुटण्याचें कारण नव्हतें. पण हे ब्राह्मण ठरल्या बद्दल जें नागांवच्या सभेचें त्यांनीं प्रोसिडिंग [ ठराव ] दाखविलें तें बिन सहीचें असल्यामुळें जगद्गुरूंस खोटें वाटून नागावास तिकडून लिहून आलें ह्मणून ही लबाडी बाहेर पडली. तें जगद्गुरूंचें नागांवकरांस आलेलें आज्ञापत्र येणें प्रमाणें.

## शिक्का.

श्रीमच्छंकराचार्य संस्थान शृंगेरी श्रीमठाकडून.

नागांव येथें राहणार समस्त ब्रह्मवृंद यांस–सेतुबंधरामेश्वर येथें राहणार आर्य महाराष्ट्र ब्राह्मण यांच्या प्रकरणांत श्री संस्थानांत चौकशी चालत आहे हाच प्रकरणांत येथून

नारायण रामनाथराव तेथें आले वेळीं नागांव येथें ब्रह्मवृंदाची सभा भरवून हा लोक ब्राह्मण आहे कन्यासंबंधादि व्यवहार करण्यांत संशय नाहीं असें एक ठराव झाले आहे ह्मणून मिती फाल्गुन वद्य ९ चे एक ठरावपत्राचे नक्कल बगर सहीचे हाजर जाहले आहे याचा सत्य स्थिती बाळगणेचें अवश्य आहे कारण हें पत्र पोंचल्याबराबर वर लिहिले ठरावाचा नक्कल तुमचे सहीनिशीं सेतुबंधरामेश्वरास पाठवावे. सत्वर पाठवावे. ता० ४ जून सन १८९४

मु. रामेश्वर सही

कारभारी.

आतां या पत्राचें उत्तर नागांवकर कांहीं मंडळी कडून सुरळीत गेलें होतें. तथापि कांहीं लोकांचें त्यांजला गुप्त साह्य झालें असलें तर कांहीं लोक यांजला आपले ब्राह्मण ह्मणतात इतका संशय जगद्गुरूंच्या पुढें मांडण्यास तो कागद त्यांजला उपयोगी पडला यांत संशय नाहीं. अशा प्रकारें त्यांच्या जमातीच्या व द्रव्याच्या बळावर किती खोटे पुरावे पुढें आले असतील व किती खरे दबून गेले असतील ते त्या रामेश्वरकरांस व त्या सेतुबंधरामेश्वरासच माहित. बळावणीं झालीं असतां साक्षीदार लोक हजर झाले नाहींत

व निकालास पाहिजे तसा पुढें पुरावा आला नाहीं असें निवाड्यांतही जगत्गुरूंनीं लिहून ठेविलेंच आहे. आणि इतकें असूनही कदाचित् आपल्या उलट निवाडा झाला तर जगद्गुरु आमच्यापाशीं या न्यायाबद्दल फार रु० मागतात अशीही रामेश्वरकरांनीं ओरड पूर्वींच चालविली होती. असो पुढें आलेल्या चौकशींत निस्पृह बुद्धीनें हल्लींच्या काळास अनुसरून समजणारास खरें समजेल अशा प्रकारचें जगद्गुरूंनीं तिरमान ( निवाडा ) दिलें. त्या निवाड्याची एक नक्कल व निवाड्यांतील अर्थाच्या गोषवाऱ्याचें एक पत्र नागांवग्रामस्थांकडे आलें. तो निवाडा व तें पत्र येणें प्रमाणें.

श्री

शिक्का

श्रृंगेरी मठ स्वामीचा.

श्रीजगद्गुरु संस्थान श्रृंगेरी मठाचा अधिकार स्थानांत महास्वामी यांचा आज्ञा प्रमाण कारभारी श्रीकंठ शास्त्री यांच्याकडून केलेलें तीर्मान.

ता० २० जून सन १८९४ मुक्काम रामेश्वर.

फैसल नंबर

फियादी

बोंबाय इलाखा, कुलाबा जिल्हा, अलीबाग तालुका, नां गांवकर वासुदेवभट बिन नारायणभट साठे वगैरे.

अपराधी

रामेश्वर क्षेत्रांत राहणार नरहरी रामचंद्र ढवळे वगैरे १८ लोक आणि हा जातीचे लोक सुद्धां.

फिर्यादी विजय संवत्सर पौष शुद्ध ९ ह्मणजे १८९४ इ० जानेवारी तारीख १६; रजिष्टर टपालद्वारा श्री जगद्गुरु महास्वामी यांचे संनिधानास विज्ञापना पत्रिकारूप फिर्याद रवाना केले. सदर विज्ञापना पत्रिकारूप फिर्याद २८।१।९४ ह्या रोजीं संस्थानास दाखल जहाले.

## फिर्याद सारांश

अपराधी लोक हल्लीं अजमास २३ वर्षीपासून मुंबई इलाखा नागांव आक्षी आवास किहीम वरसई इत्यादि ग्रामा हून ८।९ मुलींनें लग्न करून गेले आहे ह्मणून, व लग्न झाल्या नंतर अपराधी लोकांचा विषयांत आपल्यास कळून आलेले यांत अपराधी लोक पंचद्रवीडांतर्गत ब्राह्मण नसल्या कारणानें त्यांचा बरोबर इतर लोक सहपंक्ती भोजनादि सव्यवहार चालवीत नाहीं असें कळून आल्यावरून अपराधी लोकां पैकीं काहीं लोक आपल्या स्वदेशास आल्या वेळीं हा विषय विचार करण्यांत तृप्ती होणें जोगें समाधान

न सांगितलें ह्मणून, व हल्लीं संनिधानांत विचार करून हा अपराधी लोक जातींत कोण, यांचा बरोबर विवाहादि संबंध करूं ये, या करूं नये. कोणतेंही करूं नये ह्मणून असले तर हल्लीं केलेले लोकांस काय करावें. इत्यादि नमूद केलें आहे.

फिर्यादिचा स्वभाव आपणास उत्पन्न झालेले संदेह स्थानीं निवारण करावे असे उद्देशाचा आहे.

तसा असले तर ही, हे फिर्याद मुकदमा एकेच ठेवून क्रम प्रकार अपराधी लोक व कोणास तर ही साक्षी अपेक्षा केले तर तो साक्षी लोकांस आणि संस्थानास अवश्य वाटलें तर तसें अवश्य करा. लिहिलेले साक्षी सुद्धां विचार करून क्रमशः साधक बाधक पाहून तीरमान पत्र लिहावें; ह्मणून रामेश्वर क्षेत्र ह्मणजे हा अपराधी लोक स्थायिक वास करणेचे स्थळास येऊन ते तारीख ते विचारास हजर होण्यासाठीं अपराधी लोकांस आणि हा विषयांत क्रमशः स्थळ अमळ व पूर्व सांप्रदाय अपराधी लोकांस आचरण सुद्धां कळण्यासाठीं संस्थानाकडून अपेक्ष केलेले हा स्थळवासी आंध्र द्रविड माहाराष्ट्र ब्राह्मणामध्यें ६ साक्षीस सुद्धां विचारास हजर व्हावें ह्मणून नोटीस करण्यांत आले.

अपराधी लोकाचा आणि साक्षी लोकाचा सांगणें सारांश.

अपराधी लोक आपण पंचद्राविडामध्यें आर्य महाराष्ट्र ब्राह्मण ह्मणून ही, कर्धी ही, रामेश्वर क्षेत्रांत राहून रामनाथ स्वामीचा कैंकर्य ह्मणजे देवळांत देवाचा अभिषेकास पाणी घालणें व देवाचा नैवेद्य करणें इत्यादिक सर्व कार्या वरून आणि क्षेत्र यात्रा करितां येणारे लोकांचा पौरोहित्यादि कार्य करण्यावरूनही जीवन करितो, ह्मणूनही, बहुत दिवसाचे पूर्ण उत्तर देश ह्मणजे मुंबै वगैरे इलाख्यांत आपली पूर्विक, महाराष्ट्र ब्राह्मणाबरोबर विवाहादि संबंध करून आले आहे, असें आपली कळण्यांत आली आहे. ऐलीकडे हा रामेश्वरांत अपराधी लोकांचा जातीमध्यें १९० कुटुंबा पर्यंत रहात असून येथेंच विवाहादिक संबंध चालविण्या बद्दल मुल्या मिळत असल्या कारणानें बहुत दूर देशांतून विवाह करून येण्याचे अवश्यक नसल्या कारणा वरून ही असें करून येण्याबद्दल द्रव्यानुकूल नसल्या कारणानें सुधा तद्देशांतून लग्न करून येत नव्हते. वर लिहिल्या अनुकूलताही बहुत दूर देशांतून लग्न करून येण्या बद्दल राहिलेले अनानुकूलताही नसल्या वरून फिर्यादि लोक सांगणेची लग्न करून येण्याची संभव येऊन लग्न करून आले आहे ह्मणून ही. आपल्यात कधिही उत्तर देशाचे महाराष्ट्र ब्राह्मण लोक आणि अनेक ब्राह्मण लोक सुधा येऊन पौरोहित्यादि कार्य

चालवून परस्पर भोजनादि सव्यवहार करून जात आहे ह्मणून ही. हा क्षेत्रांत रामनाथ स्वामीचा पूजा बद्दल येण्याचे महाराष्ट्र ब्राह्मण आपलेमध्यें विवाह करून आपले बरोबर रहात होते ह्मणून ही. हल्लीं पूजा करीत असणार गोविंद भट वामन भट वासुदेव भट सुद्धां हा गावास आल्या नंतर बहुत दिवस आपलेमध्येंच राहून अलिकडे देवळाचा म्यानेजर यांस व अपराधी लोकांस द्वेष उत्पन्न होऊन विरोध जहाल्या-वेळीं म्यानेजरचा साह्यता वरून आपणास सोडून निराळे रहात. पुजादिक चालवीत आहे ह्मणून हा आपल्या मध्येंच अनेक महाराष्ट्र ब्राह्मण वगैरे येऊन क्षेत्र पौरोहित्यादि कार्य करून घेऊन येथें करणेचें सर्व दान वगैरे कार्य आपले द्वारीच चालवून जहाले आहे, ह्मणून ह्मणण्याविषयीं हाजर असणेंचे सन्नद ह्मणजे पुणें पेशवाय, श्रीमंत विंचूर अण्णासाहेब, जहागिरदार कुरुंदवाड संस्थानाधिप, रामदुर्ग संस्थानाधीश, नरगुंद संस्थानीय, रामचंद्रपूर मठाचे स्वामी, इत्यादि लोक आणि वहुत लोक लिहून दिलेली शासन संस्थानांत हजर करून शेरानिशीं परत घेतलें आहे ह्मणून ही, इत्यादि कारणावरून ही आपण महाराष्ट्र ब्राह्मण आहें असें लिहीत आहे.

१ संस्थानाकडून आपेक्ष केलेले साक्षा पैकीं पद्दूर राम

शास्त्री ह्मणणार अपराधी लोक पंचद्राविडा पैकीं आहे किंवा नाहीं तो भाग माहिती नाहीं. यांचा बरोबर सहपंक्ती भोजनादिक ह्या प्रांतांत चालत नाहीं. रामनाथ स्वामी देवळांत स्वामीचा सर्व कैंकर्य अपराधी लोक करीत आहे. क्षेत्र पौरोहित्यादि कार्य यांनीं चालवितात. हल्लीं पूजा करणार महाराष्ट्र ब्राह्मणांनीं अपराध्यामध्यें रहात होते ह्मणून वगैरे लिहवीत आहे.

२ कोडूर सुब्रह्मण्य शास्त्री यांणीं अपराधी लोक पंचद्राविडांतर्गत ब्राह्मणच नव्हे ह्मणून ही कधीं ही हे लोकांस व इतर लोकांस सहपंक्ती भोजनादि चालू येत नाहीं. अलिकडे वेदाध्ययन करीत आहे, रामनाथ स्वामी देवळांत सर्व कैंकर्य पूजा शिवाय चालू येत आहे. यांणीं पंचद्राविडांतर्गत ब्राह्मण नाहीं ह्मणण्या विषयीं श्री जगद्गुरु संस्थानांतून विलंबी संवत्सरांत दिलेलें श्रीमुख १ अपराध्यास व ह्या गांवचे महाजनास पौरोहित्य विषयीं कोर्ट द्वारीं व्यवहार चालविल्या समयीं महाजनाकडून दिलेलें स्टेटमेंट नकल १ कोर्टांत पौरोहित्य बाध्यतासाठीं झालेले तीरमानाचा नकल १ ही आपली जवळ असून तो आधारावरून आणि अपराध्यास सांगणेचे नांवचा जात हा गांव शिवाय कोठेंही नाहीं, असें कळून येण्यावरूनहि अपराध्यामध्यें विवाह करून घेऊन देवतापूजा

करीत राहिलेले महाराष्ट्र ब्राह्मणास उत्पन्न झालेले यास रामेश्वरचा पूजा करणें अधिकार नसल्या कारणानेंहि ब्राह्मण नाहीं ह्मणून सांगतो.

त्याच्या बरोबर सव्यवहार करीत राहिलेले लोकांस प्रायश्चित्तादिकडून सव्यवहार घेणेचे आहे, असें अनेक लोकांस घेतले आहे ह्मणून लिह्वीत आहे.

३।४ गोविंदभट वासुदेवभट सुधा हा गांवास आल्यावेळीं अपराधी लोकांमध्येंच वास करून राहून ऐलीकडे रामेश्वराची पूजा करण्याबद्दल देवळाचा म्यानेजर आपेक्ष केल्या वरून त्यांचा आपेक्षा प्रमाणें अपराधी लोकांस सोडून हा रामेश्वर क्षेत्रांत असणार इतर माहाजन करविलेले प्रायश्चित करून घेऊन रामेश्वराची पूजा करीत आहेत. त्याचा ऐलिकडे अपराधी लोकांबरोबर हा गांवचा द्राविड महाजन आंध्र महाजन न गेल्यावरून आपणही जात नाहीं. अपराध्याबरोबर असलेला वेळीं श्राद्धादि कर्म सर्व त्यांच्यामध्येंच चाळवित होता ह्मणून ही अलिकडे त्याला सोडल्या नंतर वर सांगितलेले ह्या गांवचा इतर महाजनामध्यें करीत आहों. आपण पाहिल्यापासून अपराध्या वेदाध्ययन वगैरे सर्व करीत आहे. देवळांत पूजा एक शिवाय बाकी सर्व कार्य अपराध्या करीत आ ह्मणूनही लिह्वीत आहे.

संस्थानाकडून आपेक्ष केलेले साक्षा पैकीं द्रविड महाज-नापैकीं वेंकटाचल दिक्षित पिच्चू वैय्यर हा दोघे हजर न होऊन चुकले आहे.

श्री जगद्गुरु संस्थानस्थ यांणीं विचारांत निर्णय करून तिरमान करणेंचे विषय ह्या खालीं विवरण केले आहे.

काय ह्मणजे

१ अपराधी झालेले आर्य मंडळी लोक पंचद्राविडां पैकीं मिळालेले ब्राह्मण आहेत किंवा नाहींत.

२ ब्राह्मण होऊन असले तर कोणते जातींचे असतील.

३ ह्या लोकांस इतर ब्राह्मणां बरोवर सहपंक्तिभोजन आहे या नाहीं.

४ तसे नसले तर नसल्यास कारण काय.

५ अपराध्या हल्लीं करून आलेले विवाह साधु या असाधु आहे.

६ पुढें असे विवाह करूं ये या न करूं ये.

# तिरमान

१ आपराध्या पंचद्रवीडापैकीं मिळालेले ब्राह्मण ह्मणून सांगावें. शिवाय नाहीं ह्मणून सांगण्यास साध्य नाहीं. कसा ह्मणजे वर संस्थान स्थानी विचार केलेले साक्षा पैकीं

रामशास्त्री यांणीं अपराध्या पंचद्राविडा पैकीं मिळालेले आहे किंवा नाहीं आपणास कळत नाहीं ह्मणून सांगत आहे. परंतु आर्य महाजन ह्मणून अपराधी लोकांसही व्यवहार आहे ह्मणून ही असे व्यवहार करणेचे ब्राह्मणा शिवाय इतर लोकांस नाहीं ह्मणूनही आपणासहि पारिशे भट्ट महाजन ह्मणून व्यवहार आहे. देवळांत देवाचें पाणी घालणार नैवेद्य करणार देवाच्या दर्शना बद्दल येणारा ब्राह्मण वगैरे सर्वांस गंगाभिषेक तिर्थ प्रसाद देणार अपराधी लोकच ह्मणून ही कोटी तीर्थांत पाणी काढून स्नान करविणेचे अपराध्या ह्मणून ही महाराष्ट्र देशांतून आलेले ब्राह्मण अपराध्यामध्यें विवाहादि संबंध करून घेऊन पूजादि कार्य करीत होते ह्मणूनही हल्लीं पूजादि करणार सुद्धां अपराध्या बरोबर राहून ऐलिकडे प्रायश्चित्त घेतलें आहे ह्मणण्या वरून आपणा बरोबर सहपंक्ती भोजन प्रतिभोजनादि करीत आहे ह्मणोन सांगत आहे.

२ साक्षी सुब्रह्मण्य शास्त्री यांणीं अपराधा पंचद्राविडांतर्गत ब्राह्मण नाहीं ह्मणोन कंठोक्त सांगत आहे. तर असें सांगण्या बद्दल आधार विळंबी संवत्सरांत श्री जगद्गुरु संस्थानाकडून दिलेले श्रीमुख पहिला आधार सांगत आहे. सदरहू श्रीमुख कंठोक्त होऊन अपराधी ब्राह्मण नाहीं

ह्मणोन सांगण्यास अवकाश उत्पन्न करूं देत नाहीं. कसें ह्मणजे विलंबी संवत्सरांत दिलेले श्रीमुखांत श्रीस्वारी रामेश्वर क्षेत्रांत लक्ष्मण तीर्थ धनुकोटी वगैरे जागामध्यें स्नानार्थ गेल्या वेळीं क्षेत्रसंकल्प वगैरे आपण सांगावे ह्मणून आल्या समयीं अपराध्या महाराष्ट्र ब्राह्मणास मुली देऊन तो जांवयाकडून देवाचा पूजा करणेंचे सांप्रदाय ठेवून राहिल्यावरूनहि तसा जावयास उत्पन्न झाले यांनीं रामनाथ स्वामी पूजा करणेंचे सांप्रदाय नाहीं ह्मणूनहि कळून आल्या कारणानें सुद्धां संदेह उत्पन्न होऊन अपराध्यास जाती विषयीं आचरणा बदल विचार केल्या वेळीं कोणतेही न सांगल्या गेल्या वरून संकल्पादिक सांगण्यास अवकाश न देतां सोडिलें आहे. ह्मणून ही पुढें जाती निर्णय होऊन संस्थाना कडून आज्ञा देऊन येण्या पर्यंत अपराध्या कडून क्षेत्र संकल्पादि वगैरे करून घेऊं नये, हा लोकांकडून कोटी तीर्थाचें पाणी घेऊन स्नान करूं नये, असे आज्ञा देउन असल्या वरून अपराध्या ब्राह्मण आहे ह्मणून हो, या ब्राह्मण नाहीं ह्मणून हो विचारांतून निर्णय करून आज्ञा दिली नाहीं ह्मणणें स्पष्ट होऊन आहे. तसें ब्राह्मण नाहीं ह्मणूनच निश्चय होऊन राहिले तर दुसरी आज्ञा निरीक्षावर हव्यकव्यादिक न करून द्यावे ह्मणून सांगणेचा अवश्यक न होतें. आणि वर

सांगितलेले विलंबी संवत्सरांत उत्पन्न झालेली आज्ञापत्र अं-
गिरस संवत्सरांत श्री जगद्गुरु महास्वामी होऊन असलेले
नृसिंह भारती स्वामी यांचा श्रीमुखावरूनच रद्द करून अप-
राध्या ब्राह्मण नाहीं ह्मणण्या विषयीं उत्पन्न होऊन असलेले
संदेह निवारण झाले आहे, ह्मणोन ही विलंबी सालचा आ-
ज्ञाचा पूर्वीं हा आपराध्या कडून चालवीत आलेले सर्व कार्य
ही चालऊं यावे ह्मणोनही स्पष्ट सांगितली आहे. विलंबी
संवत्सराचा आज्ञा तेच हा अपराध्या क्षेत्रास आलेले लोकांस
क्षेत्र संकल्पादि हव्यकव्य करवीत होते ह्मणोनही कोटी
तीर्थाचें पाणी सर्वांस देत होते ह्मणोनही नमूद करून अ-
सल्या कारणानें हा अपराध्या ब्राह्मण नसले तर फार दिवसा
पासून संकल्पादि हव्यकव्य कार्य कसें चालवीत? येथील
ब्राह्मण नसलेली लोक ब्राह्मण ह्मणोन सांगण्याबद्दल कदाचित्
संकल्प अभ्यास केले असतील ह्मणण्यास साधारण ५०–६०
वर्षां पासून हा लोक संकल्पादि कार्य चालवून येत होते
ह्मणण्या विषयीं श्री संस्थानाकडून दिलेले श्री मुखांतून स्पष्ट
कळून येण्या कारणानें तसें सांगण्यास साध्य नाहीं—अप-
राध्या ब्राह्मण नाहीं ह्मणोन दुसरी आधार ह्मणून सांगण्याचे
मधुरा जिल्हा कोर्टांत रामेश्वराचे आंध्रमध्व महाजनाकडून
हजर केलेले स्टेटमेंट ह्मणणेचे एक व्यवहारामध्यें वादी

प्रतिवादी होऊन व्यवहार चालविण्या वेळीं एक कक्षीचा लोक आपली कक्षीस अनुकूल होण्यासाठीं लिहून दिलेले एक रिकार्ड अपराध्या अब्राह्मण ह्मणून दाखविण्याबद्दल समर्थ झालेले रिकार्ड ह्मणून संस्थान स्थानीं अंगिकार करीत नाहीं– तिसरे कोर्ट तीरमानांत हक्कदारी कोणाचा आहे ह्मणण्या विषयीं विचार चालून अनेक कारणांतून क्षेत्र पुरोहिताचा हक्क अपराध्यांस संबंध झालेले नाहीं ह्मणून सांगणेचे संदर्भा- मधें श्रीजगद्गुरु संस्थाना कडून दिलेले ह्मणून वर सांगितल्या श्रीमुख कोर्टांत हजर होऊन तो श्रीमुखाचा आधारावर अप- राध्या ब्राह्मण नाहीं ह्मणून सांगितल्या तिरमान अपराध्या ब्राह्मण नाहीं ह्मणून सांगण्याबद्दल पुरे झालेले आधार अस- णेचे रिकार्ड ह्मणून अंगिकार करीत नाहीं.

४ अपराधाचा जातीचा लोक हा रामेश्वर शिवाय अन्यत्र कोठेंही नाहीं ह्मणण्याचे कारणावरून अपराध्या ब्राह्मण नाहीं ह्मणोन सांगण्यास साध्य नाहीं. कशाला ह्मणजे अपराध्यांचा जात फलानें ह्मणोन न करुणें समर्थी कोठें आहे ह्मणोन हो, या कोठें नाहीं ह्मणोन हो, निर्णय करणेचें असाध्य आहे—प्रायशः हा देशांत आंध्राद्रविड हेच फार असणेचे, बाकी कमी. कर्नाटक महाराष्ट्र हा जात अपूर्व होऊन असल्या वरून अपराध्या हा गावांत मात्र वर सांगि-

तलेले एक जातीचेही नसून आर्य महाराष्ट्र ह्मणोन एक नांवानें १९०।२०० कुटुंब पर्यंत असल्यावरून एक रीतीचा संशय करण्याबद्दल अवकाश आहे. तसें असलें तर ही इतरत्र ह्मणजे हा क्षेत्रसमीपांत कोठेंही नसून हा स्थळांत मात्र राहण्यास कारण योजन करण्यांत हा लोक कोणतेहि एक देशाचे होऊन कदाचित् एक समयीं हा स्थळास येऊन मिळून येथें हें क्षेत्र असल्या कारणानें क्षेत्रवृत्ती करून जिवनोपाय चालत असल्याकारणानें सुद्धां येथेंच राहिले ह्मणोन सांगण्यास येतें इतकेच कारणानें अब्राह्मण ह्मणोन सांगण्यास होत नाहीं असें योजितों.

९- अपराध्यामधें विवाह करून घेतलेले यास उत्पन्न झाल्यास पूजा करणेचे अधिकार नाहीं ह्मणोन सांगत आहे. यांचा सांगण्यावरून अपराध्याचा घरचा मुलीस महराष्ट्र देशाकडून आलेले ब्राह्मणांनीं विवाह करून घेत होते ह्मणोन स्पष्ट कळून येतें. अपराध्या ब्राह्मणच नसले तर बहूत दूर देशांतून पूजासाठीं येणार आपले देशांतून विवाह करून येत नव्हते काय. कदाचित् लग्न होऊन असले तर ही पुनश्च लग्न करून घेत होते काय—या तसे विवाह नसून येथें येऊन अपराध्याचा मजकूर कळू व आपणास ब्राह्मण्य गेलें तर ही जाऊंदे ह्मणोन मनःपूर्वक अपराध्यांत विवाह

करून ब्राह्मण्य सोडतात काय—हा कारणानें हे संभव न होईल. मुख्य कोणते एक प्राचीन संप्रदाय ह्मणोन सांगावे—कसें ह्मणजे उत्तर देशांतून महाराष्ट्र ब्राह्मण येथें येणेचे, असल्यानंतर अपराध्यामध्यें लग्न करून पूजा करणेचे—नंतर उत्पन्न झालेले यांनीं पूजा करणेचें नाहीं ह्मणोनहि असे अनुसरून येऊन असतील—तसे अपराध्यापैकीं लग्न केलेल्याच्या पोटांत उत्पन्न झालेले यांनीं ब्राह्मण नाहीं ह्मणण्याचा कारणावरून पूजा अधिकार नाहीं ह्मणोन सांगणेचें असेल तर ब्राह्मण नसलेले अपराध्यापैकीं विवाह करून याचा बरोबर भोजन प्रतिभोजन करून असलेले यांणीं मात्र कसे ब्राह्मण होऊन असून योग्य होईल. हा कारणावरून ब्राह्मण नाहीं ह्मणोन सांगण्यास संदर्भ नाहीं. तर ऐलीकडे पूजा करणार कशाला तसें केलें नाहीं ह्मणोन ऐकिलें तर हल्लीं पूजा करणार पूजा करितांच हा क्षेत्रास आले नाहीं. येथें आल्यानंतरही अपराध्यास वाईट करावे ह्मणोन द्वेषाकडून राहिलेले म्यानेजरचा आश्रयबलानें पूजा करण्यास नेमिले—तेच करण्यावर पहिले आपले देशांतून विवाह करून आले आहे. शिवाय बाकी राहिलेले अपराध्यामधें लग्न न करूं घेतां आपले स्वदेशांतच लग्न करून आले असतील—जसे अपराध्या असे कळून हल्लीं पूजा करणार अपराध्यापैकीं संबंध केले नाहीं ह्मणून

सांगणेचे पक्षास अब्राह्मणामधें फार दिवसापर्यंत वास करीत असुन भोजन श्राद्धादिक ब्राह्मणकर्म हे सर्व अपराध्यामधेंच चालविले असतां अपराध्या अब्राह्मण म्हणोन येथें संबंध सोडिले म्हणून कसें सांगणें होईल? वर सांगितल्या कारणा वरूनही अपराध्या निरांतकानें बहुत लोक महाराष्ट्र ब्राम्हणास आणि इतर ब्राह्मणासुद्धां फार दिवसापासून पौरोहित्यादि कार्य करवीत त्यांचा बरोबर सव्यवहार चालत आल्या बद्दल त्यांचा कडून हजर केलेले अपराध्याचा वांगमूळांमधें सांगितलेले रिकार्ड संस्थान स्थानी शोध करून पाहिल्यावरून ही हा क्षेत्रांत असणेचे कोटीतीर्थ समस्त ब्राह्मणास अपराध्याच कडून स्नान करवीत असल्यावरूनही रामेश्वर देवळांत आलेले सर्वांस सहजतेनें गंगाभिषेक तीर्थ सुद्धां देत आल्यावरूनहीं सुद्धा अपराध्या ब्राह्मण नाहीं ह्मणोन व पंचद्रवीडांतर्गत नाहीं ह्मणोनही सांगण्यास ही अनुकूल नाहीं. असें वाटतें.

२ हा अपराध्या कोणते जाती ह्मणण्या विषयीं असेच ह्मणून हल्लीं निर्णय करण्याबद्दल कोणाकडूनही साध्य झालें नाहीं. हल्लीं आपराध्यांच्या आचरणा कडून विशेष होऊन अपराधी लोक महाराष्ट्र ब्राह्मणांस पौरोहित्यादि कार्य करवीत येण्याचें कळून आल्यावरूनही हा क्षेत्रांत असण्याचे

जाती पैकीं म्हणजे द्रविडा पैकीं दोन तीन प्रभेदस्त आपली प्रभेदास मिळालेले तत् तत् प्रभेदानुसार पौरोहित्यादि कार्य करवीत आहेत. असल्यावरूनही तैलंग क्षेत्रास येणार सर्व आंध्रास आणि कर्नाटक कर्मी हवीक वगैरे प्रभेदाचा लोकांसुद्धां पौरोहित्य कार्य करीत येत असल्यावरूनही आलेले मध्वमतस्थास मध्वमतस्थानींच पौरोहित्यादि कार्य करवीत येण्याचें संप्रदाय असल्यावरून तसले सांप्रदायानुसार अपराध्या करवीत येणेचे पौरोहित्य संप्रदाय पहाण्यांतूनहि येथें रहाणेचे अपराध्याचे जाती झालेले १५०–२०० कुटुंबाचे लोक आपण महाराष्ट्र म्हणून सांगण्यावरूनही हल्लीं विवाहादिक कार्य दुसरे कोणते देशासही जाऊन दुसरे कोणते जातींतही करूं न येतां महाराष्ट्रामध्यें करून आलेले कळून आल्यावरूनही महाराष्ट्र जातीच म्हणून सांगूं ये. तसा सांगण्या सुधा वर सांगितलेले कारणा शिवाय दुसरा कोणत्यावरूनही जाती फलानेंच म्हणून निर्णय करण्यास साध्य नाहीं.

२ अपराध्यास व हा देशांत असणार इतर ब्राह्मणास सहपंक्ति भोजनादि चालू आलेले कोणाकडूनहि कोणते रिकार्डाच्या आधारा वरूनही कळूं येत नाहीं. परंतु विशेष होऊन यात्रार्थ आलेले महाराष्ट्र ब्राम्हणास व अपराध्यास सुधा सव्यवहार चालू असतील असे रिकार्ड म्हणजे पौरो-

हित्या बद्दल लिहून देऊन हल्लीं अपराध्या जवळ असणेचा दस्ताऐवजा कडून दिसून येतें. हल्लीं संस्थानाचा नोटिशी आलेले यांत ब्राम्हण असून ब्राम्हण कर्म सर्व चालवीत असून सहपंक्ति मात्र नसतां कांहीं समुहाची लोक आपआपले समूहामध्येंच विवाहादि संबंध करीत. बहुत लोक शृंगेरी गोकर्ण मैसूर हा प्रांत रहात आहे तसे ब्राम्हण नसून सहपंक्ति भोजनादिक नसून जाण्याबद्दल असणेचें कारण सांगण्यास साध्य नाहीं. प्रायशः ब्राम्हणामध्यें अन्ननियम करणेचें बहुत आहे. मुख्यत्वें अन्नव्यवहार करण्यामाजीं आपले मनास तृप्ती नसेल तर समाधान वाटत नाहीं. तसें असेल तरही एक जातीचे लोकांसच बोलावित नाहीं ह्मणणेचें आश्चर्य आहे. त्या कारणानें कदाचित् हा अपराधि लोकांचा देश व आचार स्वभाव हे न कळतां अपरिचय देशाकडून आलेले लोकांबरोबर भोजन प्रतीभोजन करण्यास समाधान नसून सोडली असतील तर अशी ऊहा करणेचे आहे. शिवाय दुसरी कारण सांगण्यास संस्थानीय यास साध्य नाहीं असे अभिप्राय करीत आहे.

अपराध्या हल्लीं करून आलेले विवाह वर सांगितल्या कारणावरून एक तऱ्हेचे ब्राम्हण म्हणून दृढ होण्याकडून शास्त्ररित्या ब्राम्हणामध्यें केलेले विवाह असाधु होत नाहीं.

मुख्य विवाहादि संबंध करण्यास्तव कुलशील स्वभाव अनुबंध विद्याधन हे सर्व विचार करून विवाहादि संबंध चालवावे म्हणून सर्व स्मृती व सूत्रांत सांगत आहे. तसे कोणतेहि विचारतां हा फिर्याद्या लग्न केलें नाहीं म्हणणें त्यांचा फिर्यादी वरूनच स्पष्ट होतें. तरहि हल्लीं चालले विवाह असाधु होत नाहीं असें संस्थानस्थ यांगीं तात्पर्य करीत आहे.

हा अपराध्यामध्यें लग्न करविण्याविषयीं अपराध्या ब्राह्मणा पैकीं फलानें जातीचे ह्मणून निश्चय करण्यासाठीं बलवत्तर झालेले आधार कोठेंही मिळत नाहीं. इष्ठु दुसरी कलमांत सांगितल्या कारणावरून महाराष्ट्र म्हणून सांगणेचे असले तरही त्यांत ही अनेक प्रभेद आहे. त्यांत सर्व प्रभेदाचे लोकही अन्योन्य संबंध करणेचे सांप्रदाय नसल्या कारणा कडून तो भाग विवाह करणार महाराष्ट्रा पैकीं कोणते प्रभेदाचे आहे म्हणण्या विषयांत त्यांचा त्यांचा जाती प्रभेदास चालत आलेले सांप्रदायाकडूनही व आड व वगैरे खुणे कडूनही आणखी फलानें जातीचा म्हणून निश्चय करण्यासाठीं अवश्य झालेले सर्व परीक्षा त्यांचा त्यांचा मनास तृप्ती होईल पर्यंत विचार करून शास्त्र अनुसरून करणार करूं ये ह्मणून संस्थानस्थ स्थानी सांगण्याचें आहे. शिवाय

कधींही अपराधी लोकांस व फिर्यादी लोकांस विवाहादि संबंध न चालणेंचे करून हल्लीं आम्हींच संबंध करूं ये म्हणून संस्थानांतून सांगण्याबद्दल आवकाश नाहीं. ब्राह्मण आहे या नाहीं म्हणणें मात्र संस्थानस्थ यांणीं विचार करून संग्रह झालेले पुराव्याकडून व यांचा आचार अनुष्ठान लोक व्यवहारावरून निर्णय करणेचें आहे—शिवाय जातीचा अंतःप्रभेद निश्चय करणेंसाठीं साध्य नाहीं. हा मोकदमांत हा तीरमानांत नमूद केलेले पुराव्या शिवाय इतर तऱ्हेचे रिकार्ड वगैरे अपराध्याकडून हो या कधीं ही अपराध्यांचा सव्यवहार सोडलेले हा क्षेत्रांत राहणार आंध्र द्रविड महाज. नाकडून हो या कोणाकडून हो हजर झाले नाहीं—हा विचार बहुत मोठे विषय असल्यावरुन हल्लीं संस्थानाकडून सांगितलेले तिर्मानापेक्षां स्पष्ट निःसंदेह व विस्तार होऊन जाती वगैरे प्रभेदाबद्दल तिरमान सांगण्या करितां अपराध्या कडून हो या स्थळांत वास करणार इतर महाजनाकडून हो कोणा कडून हो या हल्लीं हजर झालले रिकार्ड व पुराव्या पेक्षा अधिक आले तर हा तिरमान पुनश्च चौकशी करण्यासाठीं योग्य झालेले आहे म्हणून व श्री संस्थानाकडून पूर्वी दिनकर कृष्ण छत्ते वगैरे यांत दिलेले आज्ञा तीरमानाकडून रद्द केले आहे म्हणूनही श्रीजगद्गुरु संस्थानस्थ यांणीं तिरमान केले आहे.

हा नक्कल अलिबाग तालुका नागांव वगैरे ग्रामस्थाचा माहिती बद्दल पाठविण्यांत आले.

सही ( तद्देशीय भाषेंतील लिपींत )
श्रीकंठ शास्त्री कारभारी.

---

नंबर ४६४ श्रीविद्या शंकर

श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्यवर्यपदवाक्यप्रमाण पारावारपारिण यमनियमासनप्राणायामप्रत्याहारध्यानधारणासमाध्यष्टांगयोगानुष्ठाननिष्ठ तपश्चक्रवर्त्यनाद्यविच्छिन्नगुरुपरंपराप्राप्तषट्दर्शनस्थापनाचार्य व्याख्यानसिंहासनाधीश्वर सकलनिगमागमसारहृदय सांख्यत्रयप्रतिपादक वैदिकमार्गप्रवर्तक सर्वतंत्रस्वतंत्रादि राजधानी विद्यानगर महाराजधानी कर्नाटकसिंहासनप्रतिष्ठापनाचार्य ऋष्यशृंगपुरवराधीश्वर तुंगभद्रातीरवास श्रीमद्विद्याशंकरपादपद्माधारक श्रीमन्नृसिंहभारती स्वामी गुरुकरकमलसंजात शृंगेरी श्रीसच्चिदानंदशिवाभिनव नृसिंहभारती स्वामिभिः

प्रियशिष्य बोंबाय इलाखा अलीबाग तालुका नागांव ग्रामस्थित अशेष ब्रह्मवृंद विषये श्रीनारायण स्मरणपूर्वक विरचिता शिवस्समुल्लसंतुतरां —असेतु हिमाचलप्रसिद्धत्वात्रभवत्श्रीमच्छंकरभगवत्पादाचार्यनिर्मित श्रीशारदापीठविषयिणी भक्तिरनवधिकश्रेयोनिदानमितिसार्वजनिनमेतत्सांप्रतः तूष्णीं पा-

ठविलेले मिती पौष शुद्ध ९ चे विज्ञापन पत्रिकावर श्रीसंस्थान स्वारी रामेश्वर क्षेत्रास दिग्विजय झाल्यावेळीं आर्य महाराष्ट्र मंडळीचा जाती प्रकरणांत क्रमशाहा विचार करून व रिकार्डांत समजलेले पुरावा वरून तिरमान पत्राचा नकल आलाहिदा तुम्हाकडे पाठविलें आहे. हा आर्य महाराष्ट्र लोक वास करणेचें रामेश्वर क्षेत्रांत वर्तमानकाळ पर्यंत चालत येण्याचे अनुभव व आचरणाबद्दल विचार करण्यांत कळणेचे मजकूर म्हणजे हा आर्य महाराष्ट्र म्हणणार ब्राम्हण असें कळून येतें. परंतु ब्राम्हणा पैकीं कोणते प्रभेदाचा आहे म्हणण्या विषयीं बलवत्तर पुरावा वरून दृढ होत नाहीं. त्या लोक सांगणेचे कारणावर आणि त्यांनीं अनुसरून येण्याचे कांहीं संप्रदाया वरून महाराष्ट्र असें सांगणेचें दिसून आलें तर ही तसेंच निश्चय सांगण्या बद्दल तृप्ती झालेलें कारण मिळत नाहीं. हा लोकांस इतर ब्राम्हणाबरोबर हा देशांत सहपंक्ती भोजनादि सव्यवहार कधींही नाहीं म्हणून कळून येतें. हा लोक हजर केलेले पौरोहित्य कामाबद्दल लिहून घेतलेले कांहीं दस्तऐवजाचा आधारावरून महाराष्ट्र देशांतून आलेले कांहीं ब्राम्हण लोक सव्यवहारादिक चालवून जात असतील असें सांगणेचें भाग आहे. परंतु तोच बलिष्ट झालेले आधार असे योजण्याबद्दल होत नाहीं. हल्लीं त्यांचा बरोबर केलेले विवाह संबंध

अज्ञान वशांत चाललेले आहे. एक तऱ्हेचा ब्राह्मणामध्यें चालले आहे असें सांगण्या वरून त्यागाहि असें सांगण्या बद्दल शास्त्राधार नाहीं. हे धर्म सूक्ष्म जाणून स्वधर्मास लोप न होणें सारखें वर्तणूक ठेवणें श्रेयस्कर आहे. मिती जयनाम संवत्सर श्रावण कृष्ण ६ श्रीस्वारी मुक्काम रामनाथपूर संस्थान. ( श्री )

---

या निवाड्याची भाषा त्या देशची असल्यामुळें थोडी ज्ञानेश्वरी सारखी समजण्यास कठीण पडते. तथापि मनन करून निस्पृह बुद्धीनें निकाल मनांत आणणारास कांहीं अडचण येण्यासारखी नाहीं. त्यांतून निवाड्याच्या अर्थाचा ताळा जमविण्यास गोषवाऱ्याचें जें एक पत्र आहे तें निवाड्याच्या खऱ्या अर्थाचें चांगलेंच बोधक आहे. पण नागांव गांव काय विचारता? त्या निवाड्याच्या अर्थांतराचीच झोंबी उडाली. कारण समजून आड रस्त्याला जाणाराला कोण परतवील. म्हणून खरा अर्थ काढण्यासाठीं एक आज्ञा असामीची कमेटी नेमली गेली. पण ती कमेटी नेमण्यांतही अशी एक मोठी चूक झाली कीं जे लोक आंतून रामेश्वरकरांचा पक्ष धरून रात्रंदिवस काळजींत आहेत तेच या कामांत पंच. फार काय सांगावें पण मागाहून असें समजलें कीं त्या रामेश्वरकरांच्या तोंडांत सांपडलेली एका पंचाची

प्रत्यक्ष पुतणी व एका पंचाच्या मेहुणीची मुलगी. ते जरी अगदीं खरे निस्पृही असले तरी त्यांनीं दुसरें काय मत द्यावें ? त्यांच्या मुलींचा कळवळा त्यांनीं बाळगिलाच पाहिजे. ते विरुद्ध मत देणारांशीं गोड बोलतात हाच मोठेपणा समजा. तेव्हां त्या दोन पंचांचीं मतें एका बाजूस ठेविलीं तर चार असामींचें मत " रामेश्वरकरांशीं रोटीबेटी व्यवहार करावा " अशी शंकराचार्यांची आज्ञा असल्याबद्दल आहे. आणि पांच असामींचें याच्या उलट आहे. हे रामेश्वरकराचा पक्ष धरलेले चार आणि दोन असे जे सहा पंच आहेत या सर्वांची एक गोष्ट लिहिल्या वांचून राहावत नाहीं. ह्मणजे रामेश्वरकरांनीं जें बुक छापलें आहे त्यांतल्याच त्यांच्या जबान्या पहा. त्यांत एक असा संगनमता सारखा ओतींव नमुना उतरला आहे कीं जगद्गुरुचे जे दोन कागद निवाडा आणि त्याच्या सारांशाचें पत्र असे आले आहेत त्या पैकीं निवाडा मात्र खरा समजावा आणि पत्र खोटें समजावें, असें सर्वांनीं ह्मटलें आहे. असें त्यांना ह्मणण्याचें कारण काय तर उघड झालें कीं पत्र आहे त्या निवाड्याच्या सारांशाचें तेव्हां वाचण्या बरोबर लोकांच्या ध्यानांत निवाड्याचा खरा अर्थ येऊन रामेश्वरकरांना आज कोणीच विचारणार नाहीं. पण तें पत्र प्रत्यक्ष मात्र खोटें ह्मणतां आलें नाहीं. कारण

फौजदारी होईल ह्मणून लाक्षणीक शब्द वेगळ्या वेगळ्या तऱ्हेनें घातले आहेत कीं, या पत्राची किंमत कोणी समजूं नये. याचीं कारणें त्यांनीं काय लावलीं आहेत? तर एक ह्मणतो त्याजवर कारभाऱ्यांची सही नाहीं. एक ह्मणतो त्यांजला हें पत्र पाठविण्याची गरजच नव्हती. अशीं अनेक आहेत. पण असलीं अयोग्य कारणें लावल्या मुळेंच मला उघड यांच्या लिहिण्यांत कपट आहे असें ह्मणण्याचा प्रसंग आला. कांकीं या कागदावर जगद्गुरूंच्या संप्रदाया प्रमाणें त्यांच्या हातची या कागदाखालीं "श्री" अशी सही आहे व वर जीं "श्रीविद्याशंकर" अशीं अक्षरें आहेत तीं प्रत्यक्ष स्वामीमहाराजांच्या शिक्यांतलीं शिक्यासह आहेत. तेव्हां जगद्गुरूंच्या हातच्या सहीपेक्षां कारभाऱ्यांच्या सहीची मातबरी विशेष समजावयाची कीं काय? चांगला तर्क. पण या बद्दल हातच्या कांकणास आरसा कशाला पाहिजे? तें पत्र खोटें पुढें केलें आहे. हा आरोप पत्र दाखविणारावर आणण्याबद्दल आह्मी क्षौर प्रायश्चित्त घेऊं असें हे पंच कबूल करीत असले तर तें पत्र नंबरीच आहे, त्याचें उत्तर मागवूं. असो. मिळून मागावांत अपसांत तंटे माजून दुफळी झाली. वाहवारे मौज. रामेश्वरकरांनीं आमच्या मुलींना उपटून मजा मारावी. मुलींच्या बापांनीं व दलालांनीं शेताभातांची

चमाण उडवावी आणि आह्मी आपलें खरें काम सोडून आपसांत लढावें. यालाच ह्मणतात कलिधर्म. पण या संबंधानें असा एक मोठा चमत्कार वाटतो कीं हीं तर कमेटीचीं मतें, जरी रामेश्वरकरां कडे गुली दिलेले लोक धरले तरी दोन्ही बरोबरी सारखींच ह्मणजे पांच सहा अशींच आहेत. परंतु कदाचित् जरी अशा ही आमचीं मतें अभिमानें एक झालीं असतीं तरी मतें खोटीं आहेत अशी जर कोणास शंका आली तर पृथ्वींत विचारण्यास जागा नव्हती कीं काय? व जर हा निकाल शृंगेरीमठ जगद्गुरूं कडलाच आहे तर त्यांनां ही विचारण्यांस हरकत होती कीं काय? या बद्दल आपल्याच गावांतल्या मतावर दुफळी व लढाई कशाला पाहिजे होती? पण हें बोलावें कोणाजवळ. एक तर्फेचे मात्र लोक ह्मणतात कीं सर्व ठिकाणचीं मतें आलीं तर आह्मीं रामेश्वरकरांस घेऊं. पण दुसरे तर्फेचे ह्मणतात कीं आह्मांला कोणाच्या मताची जरूरच नाहीं. आमच्या मतानें आह्मी आजच रामेश्वरकरांना पंक्तीस घेतलें. तेव्हां आतां आमच्यासारख्यानीं काय करावें? धडधडींत जर या रामेश्वरकरांच्या जाती बद्दल हजारों संशय आहेत आणि यानां आह्मी पंक्तीस घ्यावें अशी जगद्गुरूंची आज्ञा ही या निवाड्यांत आपणास कोठें दिसत नाहीं तर आतां आपणही

या मेळ्यांत शिरून जातीचा मिसमिष्टा करून घ्यावा कीं काय? दोहीं कडून मोठें संकटच आहे. आणि त्या पक्षाच्या लोकांचा तर असा पेगम चालला आहे कीं रामेश्वरकर हे आहेत श्रीमंत. ह्मणून त्यांच्या कडून एक लांबलचक बूकच छापविलें व त्या बुकांत शुद्ध पाद्रींचा थाट उडवून जसें पाद्री लोकांनीं आमच्या श्रीकृष्णाची आणि एशुख्रिस्ताची तुळणा करून कृष्णास लबाड ठरविलें. त्याच प्रमाणें यांनीं जगद्‌ गुरुच्या निवाड्यांत रामेश्वरकरांस पंक्तीस घेण्याची आज्ञा नाहीं ,, असें मत देणाऱ्या कमेटीदारांस मूर्ख ठरविलें आहे तितकेंच नव्हे तर रामेश्वरकरांना आर्य ब्राह्मणाचा किताब देऊन आपल्या पेक्षांही त्यांची उच्चस्थानीं योजना केली आहे हें एक प्रकारें पहाणाराच्या डोळ्यांत धूळ घालणें नव्हे काय? बुकांतील मजकुरांतल्या उघड लबाडच्या दिसतात त्या पैकीं कांहीं मासले दाखवितों.

१ कुंभकोण स्वामींचें निशाणी ११ चें जें पत्र छापलें आहे त्या पत्रावर स्वामीमहाराकडील शिपायाचीही सही नाहीं. नंबर नाहीं व शकमिती नाहीं असें असून तें पत्र हे ब्राह्मण ठरविण्या करितां पुढें केलें आणि शृंगिरी मुख्य मठाची स्वतःची सही, शिका नंबर शकमिती असून तें पत्र

नाकबूल करितात तेव्हां या बुकाला पाद्रीची उपमा न द्यावी तर काय ह्मणावें ?

२. निशाणी १४ चीं जीं दोन पत्रें आहेत त्या पैकीं एक पत्र ९० वर्षांचें असून त्यांतील मजकूर पाहतां "प्रथमारंभी सत्पुरुष काय ह्मणतात" आणि "हेचिदान देगा देवा" इतकेंच शब्द आहेत आणि त्यावरही सही शिक्का नाहींच. दुसऱ्या पुढल्या बिन निशाणीच्या पत्रावरही सही नाहीं. तेव्हां ही पत्रें केवळ लबाडीची असें ह्मणणेंच येतें.

३ निशाणी पंद्रा यांत जी एक यांनीं आपणाशीं पंक्ती व्यवहार केल्या बद्दल लांबलचक मोठ्या लोकांची यादी दिली आहे त्या पैकीं अन्नव्यवहार केल्याबद्दल एकाच्या हातचाही कागद अद्याप यांना दाखवितां आला नाहीं. तेव्हां त्या यादीचा उपयोग काय? उपाद्धोक मिळालें ह्मणून तो पंक्ती पावन झाला असें नव्हे आणि कोणी फसून जेवला असला तरीं ही उपयोग नाहीं. आपल्या जातीचे ब्राह्मण आहेत अशी आह्मीं आपली अमुक कारणावरून खात्री करून घेऊन मग यांच्याशीं पंक्ति व्यवहार केला अशीं पत्रें संस्थानिकांचीं पाहिजेत. तों पर्यंत सर्व आह्मीं थापा समजूं. असो त्या मूर्ख पंचां पैकींच मीही एक मूर्ख आहें सबब मी दिलेलें आपलें मत तुह्मा सर्व ब्रह्मवृंदापुढें आतां सविस्तर

करून ठेवितों त्याचें अवलोकन होऊन वरील निवाड्याच्या अर्थात आणि माझ्या समजुतींत जो कांहीं फरक आपणास वाटेल तो सर्वांनीं कृपा करून सांगावा ह्मणजे माझी मूर्खता वाजवी असल्यास मला ती पदरांत घेतां येईल. रामेश्वरकर माझे सोयरेही नाहींत आणि द्वेषीही नाहींत. फक्त जाती धर्माच्या सोयरेपणाकरितां लढणें आहे.

जगद्गुरूंच्या निवाड्यांत सहा मुद्दे घेतले आहेत.

१ ला—ही मंडळी पंचद्रविडांगेत आहे किंवा नाहीं?

२ रा—असले तर कोणत्या जातीचे असतील?

३ रा—यांचा इतर ब्राह्मणाशीं पंक्तिव्यवहार आहे किंवा नाहीं?

४ था—तो नसल्यास त्याचें कारण काय?

५ वा—यांनीं केलेले विवाह योग्य कीं अयोग्य होतील?

६ वा—असे विवाह यांनीं करावे कीं नाहीं?

या मुद्यां पैकीं प्रथमचा मुद्दा जरी लांब लचक आहे तरी त्या मुद्याचा निकाल दिलेलें तीन ठिकाणीं ह्मणजे या मुद्याच्या निकालाच्या आरंभीं मध्यें व शेवटीं अशीं स्पष्ट वाक्यें आहेत ती येणे प्रमाणें, आरंभाचें "अपराध्या पंचद्रविडा पैकीं मिळालेले ब्राह्मण ह्मणून सांगावें. शिवाय नाहीं ह्मणून सांगण्यास साध्य नाहीं" शेवटचें वाक्य "अपराध्या ब्राह्मण

नाहीं व पंचद्रविडांतर्गत नाहीं ह्मणून ही सांगण्यासही अनुकूळ नाहीं असें वाटतें" मधलें "अपराध्या हा गांवांत मात्र वर सांगितलेले एक जातीचेही नसून आर्य महाराष्ट्र ह्मणून एक नांवानें १६०-२०० कुटुंब पर्यंत असल्यावरून एक रीतीचा संशय करण्याबद्दल अवकाश आहे इतकेंच कारणानें अब्राह्मण ह्मणून सांगण्यास होत नाहीं असें योजितों" या तिन्ही वाक्यांचा डोक्यांत नीट विचार केला तर हे रामेश्वरकर पंचद्रविड ब्राह्मणां पैकींच आहेत अशी तरी जगद्गुरूंची पूर्ण खात्री झाली असें कोणी सांगू शकेल काय? जर कोणी या वाक्यांचा अर्थ दुसरा करील तर त्यांनीं समजूत करून दिल्यास त्याला आह्मी, गुरू समजूं. हे ब्राह्मण नाहीं असा माल विशेष पुरावा न मिळाल्या कारणानें ब्राह्मण नाहींत असें आह्मांस ह्मणतां येणार नाहीं असें मात्र आचार्यांनीं आपलें मत प्रदर्शित केलें आहे. त्या प्रमाणेंच ते पंचद्रविड असतील ह्मणून आपणांसही घेऊन चालावयाचें. बरें पंचद्रविड असतील असा जरी आह्मी सिद्धांत मानून बसलों तरी "आंध्राः कर्नाटकाश्चैव द्रविडा गुर्जरास्तथा ॥ महाराष्ट्रा इतिख्याता पंचैते द्रविडास्मृताः" या वाक्या प्रमाणें या सर्व पंचद्रविडांचे तरी आमच्याशीं रोटीबेटी व्यवहार कोठें आहेत? गुर्जर ब्राह्मणांचेंच नजीकचें उदाहरण

पहा. तेव्हां आतां पंचद्रविडां पैकीं कोणत्या जातींचे असावे या दुसऱ्या मुद्यावर विचार करावयाचा. त्याबद्दल वाक्य. "हा अपराध्या कोणते जाती ह्मणण्या विषयीं असेंच ह्मणून हल्लीं निर्णय करण्याबद्दल कोणाकडून ही साध्य झालें नाहीं. हल्लीं अपराध्याच्या आचरणाकडून विशेष होऊन अपराधी लोक महाराष्ट्र ब्राह्मणास पौरोहित्यादि कार्य करवीत येण्याचें कळून आल्यावरूनही ( मध्यंतरीं आणखीं कारणें आहेत ) अपराध्याचे जातीं झालेले लोक आपण महाराष्ट ह्मणून सांगण्यावरूही महाराष्ट जातीच ह्मणून सांगूं नये. तसा सांगण्या सुद्धां वर सांगितलेले कारणा शिवाय दुसऱ्या कोणत्या वरूनही जाती फक्तनेंच ह्मणून निर्णय करण्यास साध्य नाहीं."

या वाक्यांवरून महाराष्ट तरी खास आहेत असें आचार्यांस वाटलें असें कोणास दिसतें काय? पंचद्रविड ह्मणण्यास आठ आणे संशय होताच. त्यांत महाराष्ट्र ह्मणण्यास बारा आणे संशय आला. बरें महाराष्ट ब्राह्मण असें ही कबूल केलें तरी आह्मी पंचद्रविडां पैकींच महाराष्ट्र ब्राह्मण असें ह्मणणाऱ्या हल्लीं पंचवीस जाती निघतील पण पंक्तीस बसणाऱ्या आमच्या पांच चारच जाती आहेत तेव्हां आचार्योंनीं काढलेल्या तिसऱ्या मुद्याच्या निकालाची अवश्य-

कता आली. ह्मणजे या लोकांशीं आह्मी पंक्ती व्यवहार करावा कीं नाहीं. या बदल आज्ञा काय आहे ती पाहण्याचें आवश्यक आलें. त्या विषयीं वाक्य "अपराध्यास व हा देशांत असणार इतर ब्राह्मणास सहपंक्तिभोजनादि चालू आलेले कोणाकडूनही कोणते रिकार्डाच्या आधारावरूनही कळूं येत नाहीं."

परंतु यात्रार्थ आलेले महाराष्ट्र ब्राह्मणास व्यवहार चालू असतील असें पौरोहित्याबद्दल लिहून दिले दस्ताऐवजाकडून दिसून येतें. या वाक्यावरून ते जेथें राहतात तेथेंही कोणीच यांच्याशीं पंक्ति व्यवहार करीत नाहींत असें स्पष्ट दिसत असतां फक्त पौरोहित्य त्यांजला कोणीं दिलें असलें तरी शंका निवाल्यावर अन्न व्यवहाराचें धाडस आह्माला कसें करतां येईल? या अन्नव्यवहाराच्या कामी तर आचार्यांनीं रुपया पैकीं एक आणासुद्धां आह्मांस परवानगी या निवाड्यांत दिली नाहीं. आतां चैाथा मुद्दा कीं अन्नव्यवहार नसण्यास कारण काय? याबद्दल वाक्य "हा अपराधी लोकांचा देश व आचार स्वभाव हे नकळतां अपरिचय देशाकडून आलेले लोकांबरोबर भोजन प्रतीभोजन करण्यास समाधन नसून सोडलीं असतील तर अशी ऊहा करण्याचें आहे" या वाक्यावरून अमोळख्या मनुष्याचा देश आचार स्वभाव पाहि-

ल्यावांचून त्याच्याशीं अन्नव्यवहार न करणें हें योग्य आहे असें आचार्यही कबूल करितात. यावरून व आम्हांला यांचा आचार देश वगैरे समजल्यावांचून यांच्याशीं अन्नव्यवहार करण्याची मोठीच अडचण येऊन पोंचली. आतां पांचव्या कलमाचा विचार ह्मणजे झालेले विवाहांची वाट काय. या विषयीं वाक्य " अपराध्या एक तऱ्हेचे ब्राह्मण ह्मणून दृढ होण्याकडून शास्त्ररीत्या ब्राह्मणामध्यें केलेले विवाह असाधु होत नाहींत. " या वाक्यावरून झालेले विवाह ब्राह्मणा ब्राह्म णांत आहेत ह्मणून वारसाच्या वगैरे संबंधांस बाधक नाहींत असें आचार्यांनीं सांगिलें पण झालेल्या विवाहाच्या वधुवरानां पंक्तीस घेऊन जेवण्यास दोष नाहीं हा अर्थ या वाक्यांतून आमची कांहीं मंडळी काढते ती गहन व्युत्पत्ती मजला अजून समजली नाहीं. असो आतां शेवटचा मुद्दा राहिला पुढें असे विवाह करावे "कीं न करावे" या मुद्यांत आचार्यांनीं स्पष्टच लिहिलें आहे कीं, " हा अपराध्यामध्यें लग्न कर- ण्याविषयीं अपराध्य. ब्राह्मणांपैकीं फलानें जातीचे ह्मणून निश्चय करण्यासाठीं बलवत्तर झालेले आधार कोठेंही मिळत नाहीं " या वाक्यावरून जो दुसरा मुद्दा कीं हे पंचद्रविडा पैकीं कोणते जातीचे असावे. त्या बद्दलही आमची खात्री झाली नाहीं असें आचार्यच ह्मणतात कीं नाहीं हें वाचकांनीं

च सांगावें. आमचा आग्रह नाहीं त्या. प्रमाणें " महाराष्ट्र म्हणून सांगणेचें असलें तरही त्यांत अनेक प्रभेद आहे " हें सर्व वाक्य व निवाड्याचा शेवटचा सर्वच पारिग्राफ वाच कांनीं वाचून पाहवा म्हणजे पुढें बेटिव्यवहार करणें तो आपल्या जातीचा तपासून घेऊन जातवाल्यांनीं करावा. आम्हाला यांचा प्रभेद तर मुळींच समजत नाहीं असें त्यांनीं म्हटल्याचें स्पष्ट कळून येईल. आतां आम्हाला त्यांनी नको करूं कोठें म्हटलें आहे? अशीजर कोणी शंका काढली तर तुम्हीं आणखी चार जातीना ते आमचे ब्राह्मण म्हणून पंक्तीस घेतलेंत तर आचार्यांचें कायजातें? तुम्हीं अविरांचें कर्म केलेंत तर लोक मात्र तुम्हांस अलग ठेवतील अणि ज्यावेळीं आचार्यांकडे प्रसंग येईल त्यावेळीं मात्र आचार्य तुमचें वेगळें पान मांडन लोकांस घेऊन जेवतील. लेखन विस्तार होतो म्हणून सारांश कळवितों कीं या शंकराचार्यांच्या दोन्हीं पत्रांवरून माझ्या मतें हेंच निश्चित आहे कीं या रामेश्वरकरांचा पुरा शोध लागल्यावांचून म्हणजे हे मुळचे कोठचे, यांचे आचार कसे, यांचे गोत्र संबंध कसे, यांचा पक्का शोध लागल्यावांचून यांजला पंक्तीस घेऊं नये. कारण या रामेश्वरकरांस त्या जागीं कोणीही पंक्तीस घेत नाहींत तथापि त्यांनीं त्या वेळेसही आपण कोठून कोण आलों हें आपळे मूळ

सांगितलें नाहीं. आतांच्या पुरुषांत दिडशें वर्षे झालीं पण पूर्वीच्या लोकांनीं आपलें मूळ नाहीं दाखविलें तेव्हां कांहीं तरी घोडें पेंड खात असेलच असें ह्मणावें लागतें. आतां कांहीं मंडळी ह्मणत्ये यानां कोकणस्थांचीं उपनावें आहेत व कांहीं लोकांचे इकडे संबंधीही आहेत. यावर आमच्याच तोंडानें त्यांनीं बोलून घ्यावें हें बरोबर नव्हे. पण जर आचार्यांनाच जातीबद्दल संशय आला असला तर कोकणस्थांच्या उपनावाचे किरिस्तवही जागोजाग आढळतात. आतां नवीन यांचे संबंधी कांहीं कोकणस्थ झाले असतील पण एकदां मुंडलाकीं झाला फकीर. त्यांच्या पुराव्यावरून पूर्वीं रामेश्वरीं गेलेले कोण होते हें कसें समजावें. मी इतकी स्पष्ट लेखणी चालविणारा गृहस्थ नव्हे, पण मी आपल्या पूर्वीच्या मतांत फार अदबी ठेऊन आचार्यांच्या ह्मणण्याप्रमाणें यांना हे पंचद्रवीड समजून बखेडा मोडण्याकरितां या लोकांस तूर्त गुजराथी ब्राह्मणांप्रमाणेंच वागवावें असें ह्मटलें होतें. तथापि त्या लिहिण्याची त्यांनीं हेळणा करून टीका केली सबब आता असें लिहितों कीं गुजराथी लोकांकडे आह्मी फराळ ही करितों व त्यांना अनुष्ठानांत घेतों पण यानां तसेंही जवळ करावें अशी शंकराचार्यांची आज्ञा दिसत नाहीं.

# श्रीजगद्गुरु मठ शृंगेरी यांस विज्ञापना.

श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य निगमागमार्थप्रकाशक सदसच्छोधक कांडत्रयप्रतिपादक श्रीमद्राजाधिराज जगद्गुरु संस्थान मठ शृंगेरी यांच्या सेवेशीं.

शिष्यानुशिष्य रामचंद्र गोविंद शास्त्री बाम यांचे साष्टांगानेक प्रणाम. विशेष—कांहीं रामेश्वरकर लोकांच्या जाती निर्णयाच्या कामीं आपल्या संस्थानांतून नागांव मुक्कामीं जें आज्ञापत्र आलें होतें त्यांतील मजकूर येणें प्रमाणें.

“ मिती पौष शु० ९ ची विज्ञापनपत्र प्रविष्ट होऊन सर्व मजकूर श्रुत झाले. सेतुबंधरामेश्वर येथें राहणार आर्य ब्राह्मण यांचा बरोबर कन्यासंबंधानें तुमचे प्रांतांतील राहणार कोंकणस्थ लोकांनीं केलया प्रकर्णांत येथून दिलेली नंबर १७४, ३११ आणि जनार्दनपंत बापट जमखिंडीकर यांस दिलेली नंबर ९९८ असे तीन आज्ञा पत्र आमचे आज्ञेवरून दिलेली आहे. सदर आर्य ब्राह्मण लोकांवर पंचद्रविडांतर्गत ब्राह्मणांनीं कन्या संबंधादिसव्यवहार करणेचें वहिवाट नाहीं म्हणण्याचा मजकूर सदर आज्ञापत्रावरून स्पष्ट होत आहे. श्री संस्थान स्वारी सत्वर श्री सेतुबंधरामेश्वरास जाण्याची योजना आहे त्या वेळीं या प्रकरणांत तेथलचे विद्यमान पूर्ण शोध

घेऊन अखेर निकाल जो होईल त्याचा तपशील तुह्मांस आज्ञा देण्यांत येईल. तों पर्यंत हल्लीं कोण कोण कन्या देऊन अन्न व्यवहारादि संबंध केली आहे त्यांनीं कन्यांस मवऱ्यांच्या घरीं सोडून आज पर्यंत सव्यवहार केल्याबद्दल पंचगव्य प्रायश्चित्तानें सभा द्वारा घेऊन शुद्ध होऊन पुढें सदर आर्य ब्राह्मण लोकां बरोबर सव्यवहार न करीत असावें. सुज्ञ लोकांस पत्र द्वारें विशेष आज्ञा देण्याची काय आहे. मिति पौष वद्य १ मुक्काम मधुर जिल्हा पेरियकुलं तालुका मेलमंगल अग्रहार- श्री."

अशा प्रकारचें वसई येथें ही आलेलें आज्ञापत्र या बुकांत लिहिलें आहे. या दोन्ही पत्रांतली आपली भाषा पाहतां जें जें या रामेश्वरकरांच्या संबधानें जगद्गुरूंच्या ध्यानांत आलें त्या बद्दल स्पष्टरीतीनें आज्ञा होत आली व जरी रामेश्वरकर मंडळीनें "ती खोटी आहे. स्वामी आमच्यापाशीं तीस हजार रुपये लांच मागतात" असें छापील जाहिरातीनें ही बरोबर कळविलें. तरी आमच्या मंडळीनें जद्गुरूचीच आज्ञा मान्य करून रामेश्वरकरांशीं अन्नव्यवहार घडल्याबद्दल प्रायश्चितें घेतलीं. कारण आह्मां शिष्यवर्गांना जगद्गुरूंचीच आज्ञा मान्य झाली पाहिजे अशी बहुधा आमच्या प्रांताची समज आहे. तूर्त माझा जगत्‌गुरूंच्या चरणापाशीं विनंती कर-

मराठी ग्रंथ ... ठाणे.

ण्याचा हेतु इतकाच आहे कीं रामेश्वर येथून जें कारभाऱ्यांचें या संबंधें तिरमान आलें त्या तिरमानांत या रामेश्वरकरांबद्दल कोणतीच स्पष्टपणें आज्ञा नसल्यामुळें या तिरमानाचा मन-ताप अर्थ तत्पक्षीयांना कोरून काढण्यास अवकाश सांपडला आहे. साजवीच आहे. ज्या लोकांनीं हजार हजार बाराबा-राशें रुपये मुलीचे तोंडांत टाकले आहेत त्यांच्या ते पार्टीत एकदम कसे उतरावे? परंतु असें संशयित तिरमान लिहि-ण्याची आपले कारभाऱ्यांस मात्र गरज नव्हती. जगद्गुरु तीस हजार रुपये लांच मागतात असा सर्वत्र पुकारा कर-णारे जे गुरुद्वेष्टे हे रामेश्वरकर यांची जाती जर आजपर्यंत सर्वत्र ब्राह्मण्याविरहित राहिलेली आहे आणि यांच्याशीं अन्नव्यवहार केल्याबद्दल रा० जनार्दनपंत बापट जमखंडीकर प्रभृतींस प्रायश्चित्तें हीं जगद्गुरूंनींच दिलीं आहेत आणि रामेश्वरीं झालेल्या या नवीन चौकशींतहीं निःसंशय यांची जाती करून आली नाहीं. व तिरमानांतील रामशास्त्री यांच्या जबानीवरून या लोकांना हे परिशे ब्राह्मण असा व्यवहार आहे ह्मणूनही करून आलें. तर हे पळशेच कां नसतील अशा संशयानें तूर्त यांना, वेगळे आहेत तसेच ठेव-ण्याविषयींची आज्ञा करण्यास संस्थानांतून काय भीति होती? जर पुढें मागें खरेच पळशे निघाले तर आमच्या ब्राह्मण्याचा घोटाळा

केवढा होईल? चौकशींत खरें दृष्टीस आलें तें स्पष्टपणें लिहून, धर्मशील लोकांनीं यांच्याशीं कसें वागावें याबद्दल आज्ञा करण्याचें कारभारी यांचें कामच आहे. मग सर्वलोक आज्ञा पाळोत अथवा न पाळोत. पुराव्यांत सत्य दिसेल त्या प्रमाणें आज्ञा झालीच पाहिजे. नाहीं तर रामेश्वरकरांनीं स्वामींचें दरबार, लांच खाऊ हें जें ठरविलें आहे, त्या त्यांच्या बोलण्यास मात्र अज्ञान लोकांच्या समजुतीनें बळकटी येईल.

असो झाल्या गोष्टीस इलाज नाहीं. पण आतां स्वामींस हीच प्रार्थना करितों कीं जरी स्वामींचें हृदय दयाशील असलें तरी हें ब्राह्मण्याचें काम मूळ धर्म तत्वाचें आहे हें त्यांनीं जाणून कोणाची ही भीड न धरितां तिरमानांत लिहिल्या प्रमाणें या रामेश्वरकरांच्या जाति निर्णयाचा विचार करावा आणि या बद्दल संशय असला तर आज पर्यंत हे लोक पृथक् राहिले आहेत तसेच तूर्त ठेवण्याविषयीं आपली स्पष्ट संस्थानांतून आज्ञा व्हावी. यांच्याशीं नवीन चाल पाडून पंक्तीव्यवहार करण्याची कोणाचीही इच्छा नाहीं. पण आपल्या संस्थानचें तिरमान संशयित असल्यामुळें मात्र जे कोणी पैशाच्या लालचीनें मुली विकणारे आहेत त्यांजला मात्र रामेश्वकररांस पंक्तीस घेतों ह्मणण्यास सवड झाली. एक

वार आपल्या संस्थानचें स्पष्ट आज्ञापत्र आलें ह्मणजे आपल्या आज्ञापत्राच्या अर्थाच्या मतभेदाचा सर्व कलह मिटून सर्व देशाची एक वाक्यता होईल आणि अपसांत वाढलेले द्वेष नष्ट होतील. आणखीही मी खात्रीनें लिहितों कीं हे रामेश्वरकर इकडच्या गप्पा तिकडे व तिकडच्या इकडे अशा थापा मारून मुली घेऊन जातात पण स्वामींनीं तिरमानांत लिहिल्या प्रमाणें जर स्पष्ट आज्ञापत्र लिहून धाडलें कीं या लोकांना मिळालेल्या अपुऱ्या पुराव्या वरून पंक्तीस घेणें योग्य नव्हे तर कोणी ही मुलीचे बाप सुद्धां जगद्गुरुच्या आज्ञे बाहेर जाणार नाहींत. आज्ञा मात्र स्पष्ट आली पाहिजे. तूर्त फक्त स्वामीच्या तिरमानां वरूनच वाद पडला आहे. रामेश्वरकर हे आमच्या देशांतले मुळींच नसल्यामुळें हे पंक्तिव्यवहारास पात्र न झाले तर एकासही वाईट वाटणार नाहीं. इतकेंच नव्हे तर स्वामींनीं निस्पृहपणानें न्याय दिला अशीच ख्याती होईल.

विद्यार्थ्यानें विशेष काय लिहावें? प्रत्युत्तराची वाट पहात आहें. कृपा होऊन उत्तर आलें तर सर्व प्रांताची अस्वस्थता मिटून शांतता होईल हे विज्ञापना.

रामचंद्र गोविंद शास्त्री बाम नागांवकर

पत्ता—अळीबाग येथें 'तत्वसदन' छापखान्यांत.

## नागांवच्या पंचांस विज्ञापना.

रावबहादूर भाऊसाहेब बळवंतराव जोशी पेनशनदार प्रभृती मंडळीस विनयपूर्वक कळवितों कीं, ज्या गोष्टीची आह्मांस जरूर नाहीं असले बखेडे आपल्या घरांत येऊन पोंचल्यामुळें अतिशयित त्रासून मी हें रागानें पुस्तक लिहिलें आहे ह्मणून त्यांत कांहीं संबंधानें कोणाच्या चित्तांत भेदण्या सारखे कठोर शब्द आले असले तर त्याची त्यांनीं माफी द्यावी व कदाचित् एकादे विषयांत माझी समजूत ही चुकली असली तर तीही दर्शित करावी. सार्वजनिक जाती धर्माचाच यांत संबंध असल्यामुळें माझ्यावर कोणीही क्रोध करूं नये. या गोष्टीकरितां कृतघ्नतेचा आरोप मजवर येईलसा मला वाटत नाहीं. सुनेचा पाय सासूला लागला तरी सुनेला नमस्कार करावा लागतो. आणि सासूचा सूनेस लागला तरी सुनेलाच करावा लागतो. या प्रमाणेंच ही माझी प्रार्थना आहे.

रा० गो० ज्ञा० भाम